# प्रकरण ३ रे

## संशोधनाची कार्यपध्दती

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी वापरलेल्या कार्यपध्दतीचे विवेचन केले आहे. त्यामध्ये संशोधन विषय त्यातील उपघटक समस्येच्या संदर्भात माहिती संकलनासाठी निवडलेली साधने त्याच्या निवडीचे हेतू, ही साधने उपयोगात आणताना घेतलेली दक्षता साधनाचा उपयोग, एकूण गावाचे स्वरूप व नकाया साधनाचा उपयोग करण्यासाठी निवडलेला नमुना गट इ. बाबींचा समावेश आहे.

संशोधन कार्यामध्ये प्रथम संबधित साहित्याचा अभ्यास करणे, त्यावरून समस्या निवडणे, संबधित संशोधनासाठी पध्दती निवडणे, मूल्यमापन करण्यासाठी व माहिती संकलित करण्यासाठी साधनाची निवड सामग्री विश्लेषणासाठी काही सांख्यिकी सुत्राचा वापर करणे व अहवाल लेखन करणे या क्रमाने संशोधन करावे लागते.

प्रथम संशोधन विषय निश्चित करून त्यासंदर्भात झालेल्या संशोधन विषयाच्या क्षेत्रातील संशोधनाचा आढावा घेतला. आपल्या देशात ग्रामीण पुनर्रचनेचे झालेले प्रयत्न, प्रयोग याचा अभ्यास केला. ग्रामीण समस्या जाणण्याच्या दृष्टीने ग्रामीण जीवनाच्या अभ्यासावर आधारित असलेले संदर्भ ग्रंथ वाचले व ग्रामीण पुनर्रचनेच्या क्षेत्रांचा अभ्यास केला. तसेच माध्यमे कोणती उपयोगात आणावयाची त्याच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन कसे करायचे इ. गोष्टी अभ्यासल्या.

संशोधनामध्ये संशोधनपध्दती निश्चित करणे ही पहिली पायरी असते. माहिती संकलन पध्दतीवरच संशोधनाचे अनुमान व निष्कर्ष याची अचूकता, सप्रमाणता व

विश्वसनीयता अवलंबून असते म्हणून माहिती घेण्यास उपयुक्त ठरणारी सर्वेक्षण पध्दती निवडली.

**सर्वेक्षण पध्दती :**

"या संशोधन पध्दतीच्या माध्यमातून एकाच समस्येबाबत भूतकाळात काय घडले आहे याची नोंदविलेली माहिती जमेस धरून त्याच्या जोडीस सद्यस्थितीतील घडामोडी लक्षात घेऊन या दोन्हींचा अर्थ लावून त्याच गोष्टीबाबत भविष्य काळात काय घडणे शक्य आहे याबाबत अंदाज बांधणे शक्य होते."[१]

सर्वेक्षण पध्दतीही शैक्षणिक क्षेत्रात विशेष उपयोग करून घेतला जातो. सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे याचे यथार्थ चित्र कळते. "शिक्षण क्षेत्रातील सध्याची प्रवृत्ती काय आहे याचा प्रामुख्याने हिशोब संशोधनात केला जात असल्यामुळे चालू व्यवहारातील अनेक समस्या सोडविण्यासाठी ही संशोधन पध्दती प्रभावी ठरते. आजच्या परिस्थितीची चिकित्सा करताना काही वेळा ऐतिहासिक काळातील घडामोडींची दखल घेतली जाते. त्यामुळे प्रभावी उपाय सापडतात."[२]

सर्वेक्षण पध्दतीचे हे महत्त्व लक्षात घेऊन ग्रामीण पुनर्रचनेच्या समस्येच्या संदर्भात सर्वेक्षण पध्दती उपयोगात आणावयाचे ठरविले.

**संशोधनाची साधने :**

अभ्यासविषयाच्या संदर्भात गावातील सद्यस्थितीचा अभ्यास करून गावातील प्रश्न समजून घेणे तसेच गावाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थिती समजून घेणे महत्त्वाचे होते म्हणून सर्वेक्षणाचे साधन म्हणून प्रश्नावलीचा उपयोग केला काही क्षेत्राच्या संदर्भात मुलाखती घेतल्या. विशिष्ट व निश्चित स्वरूपाची माहिती

मिळविण्यासाठी प्रश्नावलीमध्ये योग्य प्रश्नांचा समावेश करावा लागतो म्हणून प्रश्नावलीसाठी प्रश्न तयार करीत असताना ती निर्दोष व्हावी म्हणून मार्गदर्शक व सहकाऱ्यांशी चर्चा केली. प्रश्नावलीचे स्वरूप कसे असावे? कोणत्या प्रश्नाना निश्चित खात्रीशीर उत्तरे मिळतील? निश्चित माहितीसाठी प्रश्नरचना कशी असावी या संदर्भात चर्चा केली. तसेच प्रश्नावली तयार करून ती गावातील काही स्त्रियांकडून भरून घेतली. त्यावरून प्रश्नावलीतील उणीवा दूर केल्या व नंतरच अंतिम स्वरूप दिले.

**प्रश्नावली :**

सर्वसाधारणपणे गावाचे स्वरूप, आर्थिक, सामाजिक स्थिती, आरोग्याच्या दृष्टीने असलेल्या सुविधा, धार्मिक उपक्रम, गावातील संघटना, लोकांच्या असहाराविषयीच्या कल्पना, घरातील अनौपचारिक शिक्षण देणारी दूरदर्शन आकाशवाणी, वृत्तपत्रे इ. साधनांची उपलब्धता, त्यांचे उपयोग इ. गोष्टी लक्षात येतील अशा तऱ्हेने त्यांची रचना केली. त्यात खालील मुद्दयांचा समावेश केला.

**१. कुटुंबाची सर्वसाधारण माहिती -** कुटुंबप्रमुखाचे नाव,वय, घरातील साक्षर, निरक्षर व्यक्तींची संख्या, शाळेत जाणारी मुले, शाळेत जात नसल्यास त्याची कारणे यावर आधारलेले प्रश्न.

**२. सामाजिक -** गावातील सामाजिक संख्या त्यांचे उपक्रम,अपक्रमातील कुटुंबाचा सहभाग, आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे यांची उपलब्धता व त्याचे उपयोग करमणुकीसाठी असलेल्या साधनांचा कशा तऱ्हेने उपयोग केला जातो.

**३. आर्थिक स्थिती** - उपजिवीकेचे साधन त्यातून मिळणारे उत्पन्न खर्चाचे स्वरूप,घेतलेली कर्जे, कर्जे मिळविण्याचे स्त्रोत, कामाचे स्वरूप इ. बाबींच्या माहिती मिळविणारे प्रश्न.

**४. आरोग्य** - घरातील व्यक्तींच्या आजाराचे स्वरूप. आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा म्हणजे सांडपाण्याची व्यवस्था स्नानगृहे, शौचालये यांची उपलब्धता घराच्या परीसराचे स्वरूप,पाणी, उजेड इ. किमान सुविधा.


**५. धार्मिक** - गावातील धार्मिक कार्यक्रम त्याचे स्वरूप राबविले जाणारे विविध उपक्रम, विविध मंडळे त्यांची स्थिती.

**६. आहार** - आहारात समाविष्ट पदार्थ.

७. गावातील विकासाच्या कार्यांच्या संदर्भात अपेक्षा.

अशा तऱ्हेने प्रशनावलीच्या सहाय्याने सर्वेक्षण करून गावाची आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक स्थिती समजून घेतली. अनेक वेळा प्रत्यक्ष जावून प्रश्नावली भरून घ्यावी लागली. त्यामुळे परीसराचे स्वरूपही लक्षात आले. नेमक्या कोणत्या क्षेत्रात काम करणे आवश्यक आहे याची जाणीव झाली. तसेच गावाचे विविध वर्ग,स्तर याची माहिती मिळाली व नमुना गट निवडण्यास दिशा मिळाली.

आलेख क्र.२ तालुका- श्रीरामपूर जिल्हा- अहमदनगर शिरसगांव नगर भूमापन




क्र.(१) शिरसगाव – गावठाण

**शिरसगावाचे स्वरूप :**

शिरसगाव हे श्रीरामपूर तालुक्यातील गाव आहे. श्रीरामपूरपासून ६ किं. मी. अंतरावर व श्रीरामपूर लगतच असलेले गाव. या गावाचे एकूण क्षेत्रफळ १३०७ चौ. मीटर आहे व एकूण लोकसंख्या ३६९५ आहे.

गावात प्रवेश केल्यावर 'गावठाण' लागते. या गावठाणातच गावातील बहुसंख्य लोक वस्ती करून राहिलेले आहेत. या मध्ये सर्व जातींच, धर्मांचे व सर्व स्तरातील स्त्री-पुरूष आहेत. गावठाणाबाहेर तुरळक वस्ती आहे. बराचसा भाग हा शेतीने व्याप्त आहे व जेथे दूरवस्ती आहे तेथे साधारण मोठया शेतकऱ्यांची एक - दोन घरे व त्याला लागून गोठे व मजुरांची एक-दोन घरे असे वस्तीचे सवरूप आहे. या वस्त्या शेतकऱ्यांच्या आडनावानेच ओळखल्या जातात.

एकूण गावामध्ये दारिद्रयरेषेखालील लोकांची संख्या ७१९ आहे. लोकसंख्येत कामगार शेतकरी व शेतमजूर असे विभाजन केले जाते. कामगार पुरूष ९१० आहेत तर स्त्रिया ५०० आहेत. शेतमजूर पुरूष २७३ आहेत तर शेतमजूर स्त्रिया ३०० आहेत आणि शेतकरी पुरूष संख्या २७३ आहे व शेतकरी स्त्रियांची संख्या २०० आहे. म्हणजे कामगार व शेतमजूर स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

**सांस्कृतिक सामाजिक स्वरूप :**

सर्वसाधारण गावाची प्रारंभिक पाहणी प्रश्नावलीच्या सहाय्याने केली असता गावात धार्मिक उत्सव नियमितपणे होतात व त्यात गावातील ६०% लोक सहभागी होतात. त्यात भजन, कीर्तन, ज्ञानेश्वरी, पारायणे, हरीबाबा उत्सव यांचा समावेश आहे. गावातील प्रवेशव्दारापाशीच देऊळ असून त्याचा परिसर रम्य आहे. गावातील धार्मिक उत्सव या परिसरातच होतात.

प्रबोधनात्मक कार्यक्रम व्याख्याने चर्चा, प्रदर्शने परिसंवाद या गोष्टींचा मात्र आाव आढळला. त्याचप्रमाणे गाण्याचे किंवा इतर मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमही फारसे होत नाहीत. गावात राजकीय गट असून त्यामध्ये संघर्षाचे वातावरण आहे.

**विविध संस्था :**

गावामध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिरसगाव विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था ही १९५१ लाच स्थापन झाली आहे. ज्यातून शेतकऱ्यांना शेती औजारे व मशागतीसाठी कर्जे दिली जातात. त्याचबरोबर विठ्ठल सहकारी दूध संस्थाही आहे. अगदी या वर्षी शिरसगाव प्रगत बागायतदार विविध कार्यकारी सह. सोसायटीचीही स्थापना झाली आहे. गावात ग्रामपंचायत आहे. त्यातही राजकीय पक्षाच्या मतभेदामुळे संघर्षाचे वातावरण आहे.

गावात २ अंगणवाड्या व एक मुख्य आरोग्यकेंद्राचे उपकेंद्र आहे. तेथील अंगणवाडी सेविका माता-बाल संगोपन तसेच आहार योजनेची अंमलबजावणी करतात. आरोग्य सेविका लसीकरणाचे काम करतात. गावात प्राथमिक व माध्यमिक शाळाही आहे. परंतु शैक्षणिक संस्था सोडल्यास केवळ गावविकासाचे ध्येय घेऊन प्रबोधनात्मक, रचनात्मक कार्य करणाऱ्या व राजकीय गटापासून अलिप्त असलेल्या अशा स्वयंसेवी संस्था आढळल्या नाहीत. त्यामुळे प्रबोधनात्मक जनजागरण आरोग्य, स्वच्छता अंधश्रध्दानिर्मूलन, नागरिकत्वाची जाणीव इ. बाबतचे अनौपचारिक शिक्षणाचे कार्य फ ारसे होताना दिसले नाहीत. परंपरा, रूढी भावना यांचा प्रभाव स्त्रियांवर अधिक दिसला. गावातील महिला मंडळे भजन, कीर्तन अशा स्वरूपाची कार्य करतात. स्त्रियांनी भजन, कीर्तन यात सामील होतो असे सांगितले ६०% स्त्रियांनी अशा कार्यक्रमात

सहभागी होतो असे सांगितले. तर ४०% महिलांना कोणत्याच कार्यक्रमात सहभागी होत नाही असे मत मांडले. अलिकडे गावात 'स्वाध्याय परिवार' चा एक गट निर्माण झाला आहे. आठवडयातून काही दिवस नियमितपणे काही लोक त्यामुळे एकत्र येऊ लागले आहेत.

गावात कोणते काम व्हावे असे तुम्हाला वाटते? असा प्रश्न विचारला असता गटरांची व्यवस्था व्हावी, रस्ते सुधारावेत, व्यसननिर्मूलन व्हावे, बससेवा सुरू करावी, शौचालये व्हावीत, तसेच काहींनी अशा स्वरूपाची उत्तरे दिली. स्त्रियांनी आमचे प्रश्न सोडवा, काहीतरी उद्योग सुरू करावा असे म्हटले. तर आरोग्यसेविकांनी स्त्रियांना प्रत्येकवेळी लसीकरणाला बोलवावे लागते, घरोघरी जावे लागते, तरीही स्त्रिया येत नाहीत अशी तक्रार मांडली. एकूण स्त्रियांचे संघटन करणे, त्यांना आत्मविश्वास देणे, त्यांना आरोग्याचे महत्त्व पटविणे, जागृत करणे, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबन निर्माण करण्यासाठी प्रोत्साहीत करणे. एकूण गावातील विकसातील त्यांचे सहभागित्त्व वाढविणे व निकोप सामाजिक विकासाला अनुकूल वातावरण तयार करणे हे महत्त्वाचे वाटले. त्यादृष्टीने कार्यक्रमाची दिशा ठरविली.

एकूण गावाचे स्वरूप लक्षात घेऊन, गावतील विविध स्तर लक्षात घेऊन नमुना गटाची निवड केली.

**नमुना गट** - संशोधनातील निष्कर्ष विश्वसनीय स्वरूपात येण्यासाठी आवश्यक ती संख्यात्मक माहीती पुरेशा प्रमाणात व योग्य स्वरूपाची उपलब्ध होणे आवश्यक असते. योग्य व पुरेशी माहिती उपलब्ध होण्यासाठी योग्य स्वरूपाचा व पुरेसा नमुना निवडणे अत्यावश्यक असते. ''संशोधनाच्या कार्यवाहीसाठी उपयोगात आणलेल्या संशोधनाच्या लोकसंख्येचा प्रातिनिधिक भाग म्हणजे नमुना होय''[१] हे लक्षात घेऊन नमुना निवड

प्रातिनिधिक स्वरूपाची व्हावी व विश्वसनीय निष्कर्ष यावेत यासाठी लोकसंख्येचा प्रातिनिधिक नमुना निवडला. गावाच्या प्रारंभिक पाहणीमध्ये 'गावठाण' व त्याचे स्वरूप लक्षात आले होते. गावठाण म्हणजे जेथे एकाच मध्य ठिकाणी लोक वस्ती करून अधिक संख्येने राहातात. अशा ठिकाणच्या मध्य वस्तीत गावातील सर्व जाती-जमाती व शेतकरी कामगार, शेतमजूर असे सर्व स्तराचे लोक होते. गावाचा तो एक प्रातिनिधिक भागच होता. प्रत्यक्ष कार्यक्रम राबविणे त्यासाठी सातत्याने संपर्क साधणे तसेच प्रश्नावल्या भरण्याच्या दृष्टीने वारंवार भेटी देणे आवश्यक होते. अनेक वेळा प्रत्यक्ष प्रश्नावल्याच भरून घ्यावा लागत होत्या. त्यादृष्टीने एकत्रित असलेल्या लोकांच्या घरांचा समूह व ज्यात गावातील सर्व स्तरांचे प्रतिनिधित्व होते. अशा १०० घरातील स्त्रियांच्या प्रातिनिधिक नमुना गट निवडला यासाठी स्तरीय न्यादर्शन पध्दतीचा अवलंब केला. एकूण शेतकरी स्त्रिया, शेतमजूर स्त्रिया व कामगार स्त्रिया याची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक स्तराच्या १०% स्त्रिया निवडून १०० स्त्रियांचा गट म्हणून निवडला.

| अ.न. | लोकसंख्येचा घटक | उपलब्ध | संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | शेतकरी स्त्रिया | २०० | २० | १०% |
| २. | शेतमजूर स्त्रिया | ३०० | ३० | १०% |
| ३. | कामगार स्त्रिया | ५०० | ५० | १०% |
| | एकूण | १००० | १०० | १०% |

**निवडलेली क्षेत्रे व साधने :**

सुरूवातीला प्रश्नावलीच्या आधारे ते सर्वेक्षण केले त्याच्या माहितीचा उपयोग करून प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी व विविध माध्यमे व पध्दती यांची परिणामकारकता पाहाण्यासाठी तीन क्षेत्रांची निवड केली.

१. आरोग्य शिक्षण

२. अंधश्रध्दा निर्मूलन

३. सहकारातून आर्थिक विकास बचतगट - क्षेत्रांची निवड केल्यानंतर कार्यक्रम राबविले. त्याचे तीन टप्पे करता येतील.

पहिला टप्पा - आरोग्य, अंधश्रध्दा निर्मुलन, सहकारातून आर्थिक विकास, आरोग्य, अंधश्रध्दा निर्मूलन व सहकारातून आर्थिक विकास यासंबंधीची कार्यक्रम पूर्व व कार्यक्रमोत्तर स्थिती पाहाण्यासाठी या तीन विषयाच्या प्रश्नावल्या तयार केल्या.

प्रश्नावली - ज्यावेळी संशोधकास मर्यादित वेळेत अधिकाधिक मोठ्या लोकसंख्येकडून प्रतिसाद हवा असेल व प्रत्येक व्यक्तीशी संपर्क साधणे अशक्य असेल अशावेळी प्रश्नावली या साधनांचा वापर उपयुक्त ठरतो. शिक्षण प्रक्रियेवर प्रत्यक्ष वाअप्रत्यक्ष प्रभाव टाकणाऱ्या कोणत्याही बाबींची माहिती मिळण्यासाठी प्रश्नावली वापरता येते. ''अभ्यास वस्तू संबंधिच्या मोजक्या व लिखित व पूर्वनियोजित प्रश्नांना प्रश्नावलीव्दारा प्रतिसाद मिळविता येतो.''[४]

प्रश्नावली तयार करताना मार्गदर्शक व सहकाऱ्यांशी चर्चा केली. नेमक्या कोणत्या प्रश्नातून योग्य माहिती मिळू शकेल? व कार्यक्रमोत्तर बदल मोजण्यासाठीही त्याचा उपयोग होऊ शकेल! तसेच प्रश्नाची रचना, याबाबत मार्गदर्शन घेतले. सुरूवातीला काही स्त्रियांना प्रश्नावली देऊन प्रश्न नेमकेपणाने समजतात का? याची

चाचणी घेऊन मग प्रश्नावलींना अंतिम स्वरूप दिले. अशा तीन प्रश्नावल्या तयार केल्या.

सुरूवातीला आरोग्यविषयक प्रश्नावली तयार केली. आरोग्याचा विचार करता स्त्रियांचे स्वतःचे आरोग्य, बालसंगोपन याबाबत त्यांना असलेली माहिती, तसेच त्याबाबत त्या किती जागरूक आहेत. स्वच्छतेच्या संदर्भात त्या कोणती काळजी घेतात त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यात त्या आरोग्याविषयी किती जागरूक असतात? अशा तऱ्हेच्या घटक प्रश्नात होते. खालील मुद्दे त्यात समाविष्ट होते.

स्त्रियांना होणाऱ्या सर्वसाधारण आजाराविषयी त्यांना असलेले ज्ञान यासंबंधी प्रश्न.

गरोदरपणातील आहार, नियमित तपासणी, प्रतिबंधक लसीकरण, त्यासंदर्भातील प्रश्न.

बालसंगोपन, त्याचे महत्त्व त्यांना किती पटले आहे याबाबत माहिती.

मुलांना स्वच्छतेच्या सवयी लसीकरण, आजार, सुदृढ बालकासाठी प्रयत्नांची गरज यावर आधारित प्रश्न.

आरोग्याच्या संदर्भात त्या कोणते मार्गदर्शन मिळवू इच्छितात. यासंबंधी प्रश्न म्हणजे रोग होऊ नयेत म्हणून माहिती हवी की उपचारासंबंधी वगैरे प्रश्न.

अशा विविध प्रश्नांच्या आधारे, त्यांच्या कार्यपूर्व या संदर्भातील संकल्पना, ज्ञानाची चाचणी घेतली. (प्रश्नावली परिशिष्टात जोडली आहे.)

**अंधश्रध्दा निर्मूलन :**

दुसरे क्षेत्र अंधश्रध्दा निर्मूलनाचे होते. साधारण ग्रामीण भागात कोणत्या अंधश्रध्दा दिसतात? साधारणतः लोक कोणत्या अंधश्रध्दांच्या आहारी जातात?

कोणत्या कारणासाठी ते अंधश्रध्दांचा आधार घेतात? अंधश्रध्दा जीवनाच्या कोणत्या क्षेत्रात आहेत हे पाहण्याच्या दृष्टीने दुसरी प्रश्नावली तयार केली. त्यात खालील मुद्यांचा समावेश होता.

१. अंधश्रध्देविषयी त्यांना मिळालेली माहिती त्यांचे स्त्रोत.

२. अंगात येणे, नवस त्याची कारणे या संदर्भातील प्रश्न त्यावरील त्यांच्या विश्वास माहिती.

३. ज्योतिष, शुभाशुभ, भानामती, करणी, श्राध्द शकून, अपशकूनाच्या कल्पना याबाबत विश्वास जाणून घेणारे प्रश्न.

४. बुवाबाजी, मांत्रिक, देवर्षी यांचे सहकार्य केव्हा घेतले जाते. त्याची कारणे याबाबतचे प्रश्न. (प्रश्नावली परिशिष्ट आहे.)

५. तिसरे क्षेत्र होते सहकारातून आर्थिक विकास, बचत गट निर्मिती या बचत गटाच्या माध्यमातून एकूण जाणीव जागृती, म्हणजे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राबद्दल सजगतेने विचार करण्याची वृत्ती सहकारातून धन जमा करून एकमेकींचे प्रश्न सोडविणे तसेच छोटे उद्योग उभे करण्यास प्रोत्साहन देणे. हा बचत गटाचा उद्देश होता. ग्रामीण पुनर्रचनेत सहभागातून विकास ही कल्पना आहे. त्यादृष्टिने स्त्रियांचे संघटन करण्याचा प्रयत्न विकसित करण्यासही त्यांची आर्थिक स्थिती, अडचणी, कर्जाचे स्वरूप, भिशी गटाबद्दल समजुती यादृष्टीने स्थिती जाणून घेण्यासाठी प्रश्नावली तयार केली त्यात खालील मुद्दे

   १. स्त्रियांच्या आर्थिक अडचणींचे स्वरूप जाणून घेण्याबद्दल प्रश्न.

   २. पैशाच्या उपलब्धतेचे स्त्रोत त्यात सावकार, नातेवाईक, पतसंस्था, बँका यांची घेतलेली मदत व त्याचे प्रमाण.

   ३. भिशी गटातील सहभाग व त्याचे स्वरूप

४. बचत गटाविषयी माहिती संदर्भात त्यांचे पूर्वज्ञान जाणून घेणारे प्रश्न.

५. बचत गटात सामील होण्याच्या दृष्टीने दर महिन्याला त्या किती पैसे देवू शकतात. यादृष्टीने त्यांची कुवत जाणण्याचे प्रश्न.

६. त्यांच्या समजा, गरजा व भविष्यकालीन उद्योगा विषयीच्या त्यांच्या कल्पना जाणून घेणारे प्रश्न. (प्रश्नावली परिशिष्टात जोडली आहे.)

अशा तऱ्हेने तीन प्रश्नावल्या देऊ न प्रारंभिक कार्यक्रमपूर्व माहितीचे संकलन केले.

दुसरा टप्पा - कार्यक्रमाचे नियोजन व कार्यवाही

दुसऱ्या टप्प्यात पुनर्रचनेच्या क्षेत्रासाठी वापरावयाची साधने व पध्दती, इलेक्ट्रॉनिक साधने, चित्रफिती, प्रदर्शने तक्ते, पध्दतीमध्ये गटचर्चा, व्याख्याने यासंदर्भातील नियोजन व कार्यवाही. गावातील लोकांचे सहकार्य मिळविण्यासाठी घेतलेल्या भेटी. या संदर्भातील नियोजन व कार्यवाही याचा समावेश आहे.

प्रथम गावात काम करताना गावातील लोकांचा परिचय करून देणे. आपल्या कामाचा उद्देश स्पष्ट करणे व त्यांचे सहकार्य मिळविणे महत्त्वाचे होते. म्हणून नमुना गटातील स्त्रियांच्या सतत भेटी घेतल्याच परंतु गावातील प्रमुख व्यक्तींचे सहकार्य मिळविले.

१. गावातील सरपंच व ग्रामपंचायत सदस्य.

२. गावातील जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक व जाणते लोक .

३. अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका.

४. ग्रामसेवक, तलाठी.

५. गावातील तरूण कार्यकर्ते व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी.

या सर्वांच्या भेटी घेतल्या. अभ्यासाचे स्वरूप स्पष्ट केले व सहकार्य मिळविले. ग्रामसेवक, आरोग्य सेविका यांनी दिलेल्या माहितीचा उपयोग अभ्यासासाठीच केला जाईल हे स्पष्ट केले.

कार्यक्रमासाठी उपयोगात आणलेली साधने व पध्दती.

१. चित्रफिती व चित्रवहिका (चित्रपटिका )

२. व्ही. सी. आर. (दृश्य-ध्वनी मुद्रक)

३. प्रदर्शने

४. तक्ते व लिखित साहित्य

५. व्याख्याने

६. गट-चर्चा

७. प्रत्यक्ष प्रयोग

८. व्यक्तिगत भेटी व चर्चा

या कार्यक्रमासाठी विविध संस्था व व्यक्ती यांचे सहकार्य मिळविले. तक्ते, प्रदर्शने, चित्रफि ती विविध संस्थाकडून घेतल्या. तसेच विविध तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने ठेवण्यासाठी विविध सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना भेटी दिल्या. बचत गटाचे कार्य समजून घेण्यासाठी काही संस्थामधील कार्यकर्त्यांची भेट घेतली. (यादी परिशिष्ट आहे.)

प्रत्यक्ष कार्यक्रमात उपयोगात आणलेली साधने त्यांचे स्वरूप व्याख्याने व गटचर्चा यांचे विषय.

अ. चित्रफिती - इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन, पुणे.

१. आपण बायका - मुलीच्या लग्नाचे वय, स्त्रियांचे आरोग्य, पहिल्या दिवसाचा ..., सामर्थ्य, मुलींचे शिक्षण.

२. सावट - एड्स - अर्थ स्वरूप, काळजी व गैरसमज

३. वंशवेल - मुलींच्या संदर्भातील गैरसमजुती, स्त्री-आरोग्य

४. असे कसे आम्ही भोळे अंधश्रध्दा - गावातील घटना, चमत्कार व विश्लेषण.

५. ऐलमा पैलमा - स्त्रियांचे संघटन, गरज, त्यांच्यासाठी असलेल्या विविध योजना.

२. चित्रपटिका फिल्म आशा केंद्र, पुणतांबा

१. दूसरी आवाज - स्त्रियांवरील अन्याय व प्रतिकार

२. पाणी पंचायत - शेती व पाणी यासाठी गावपातळीवर केलेले प्रयत्न.

| ३. व्याख्याने - | व्याख्याते |
|---|---|
| १. गावातील विकासात लोकांचा सहभाग | - पन्नालाल सुराणा |
| २. स्त्रियांचे आरोग्य व लसीकरण. | - डॉ. सोनल नेने |
| ३. स्त्रियांचे संघटन व गरज | - मंगला नारकर. |
| ४. आपल्या अंधश्रध्दा | - धनंजय मलाव |
| ५. स्त्रियांचे सर्वसामान्य आजार | - डॉ. वैशाली देशपांडे. |

४. गट चर्चा -

१. स्त्रियांचे आरोग्य - मुलीचे लग्नाचे वय - आजार व काळजी - डॉ. अलका तेरकर

२. स्त्रियांच्या आयुष्यातील टप्पे व आरोग्य - डॉ. अलका तेरकर

३. बचतीचे महत्त्व - मंगला नारकर

गटचर्चा २० जणींच्या गटात - सातत्याने प्रत्येक विषयाची पुनरावृत्ती

५. प्रत्यक्ष प्रयोग - अंधश्रध्दा निर्मूलन - अशोक कर्णे

६. प्रदर्शने - कॅन्सर सोसायटी निर्मित - स्त्रियांचे आरोग्य कॅन्सर सोसायटी निर्मित कॅन्सर - ओळखण्याची पध्दती, काळजी व जागरूकता.

साद गट निर्मित स्त्री स्त्रियांचे प्रश्न

कॅन्सर सोसायटी निर्मित - बाळाचे संगोपन.

७. लिखित साहित्य

१. तक्ते - अ) पंचायत विकास प्रकल्प. (इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन,)

ब) नागरिक हक्क व कर्तव्ये (इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन,)

२. पुस्तके - खास सोप्या भाषेत प्रौढांसाठी लिहिलेली

१. गाव तेव्हा जागे होते - डॉ. पी. व्ही. मंडलिक ट्रस्ट

गावातील लोकांच्या सहभागातून व संघटनामधून गावाच्या विकास कथावर आधारीत.

२. उन्हाळ्यातील आजार (इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन,) पुणे.

३. स्त्रियांचे आरोग्य पुस्तिका (लोकविज्ञान प्रकाशन) पुणे.

४. कावीळ व त्यावरील उपाय (इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन,) पुणे.

५. डॉक्टर नसेल तेथे - (मूळ लेखक - डेव्हिड वेर्नर) अनुवादीत सार्वजनिक आरोग्य विभाग, मुबई, महाराष्ट्र शासन.

३. मासिक - मिळून साऱ्याजणी (संपादक - विद्याबळ)

'साधना' (साप्ताहिक) संपादक - नरेंद्र दाभोळकर

या सर्वांचा उपयोग करून कार्यक्रमाची कार्यवाही केली.

**कार्यक्रमातील अडचणींचे स्वरूप :**

नमुना गटातील महिला या शेतमजूर कामगार शेती करणाऱ्या होत्या. त्यामुळे दिवसभर कामात असत बाहेरील काम करीत असतानाच त्यांच्यावर घरातील जबाबदारीही असे त्यामुळे अनेक वेळा कार्यक्रमाची वेळ बदलावी लागली. त्यांच्या स्वयंपाकाच्या वेळा लक्षात घेऊन कार्यक्रमाचे नियोजन करावे लागे. बऱ्याच

वेळा संध्याकाळी उशिरा किंवा रात्री ७ ते ८ त्यांना निवांतपणा मिळत असे. अशावेळी व्याख्यातांना आणणे कठीण जाई. म्हणून सामाजिक कामात रस असलेल्या कार्यकर्त्यांनाच बोलवावे लागे. सुरूवातीच्या काळात व्याख्याने, गटचर्चा कार्यक्रमाची वारंवार आठवण करून द्यावी लागे. परंतु नंतर स्वत: सहभागी होण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यांना चर्चेत रस वाटू लागला. चित्राखालील वाक्ये व घोषणा तसेच तक्ते निरक्षर स्त्रियांना समजावून द्यावे लागत. चित्रप्रदर्शने मात्र तरीही त्यांना आवडत असत. 'साद' गटाने बनविलेले प्रदर्शन बातम्यांचे संदर्भ समजावून द्यावे लागले. आरोग्यावरचे प्रदर्शन लसीकरणाच्या दिवशी ठेवले तर मुलांच्या रडण्यामुळे स्त्रिया शांतपणे ते पाहू शकल्या नाहीत म्हणून वेळ वेगळी ठेवावी लागली.

तसेच कार्यक्रमांचे नियोजन करताना स्त्रियांची साप्ताहिक सुटी पाहून करावे लागे. तसेच स्त्रियांचे जणवार लक्षात घेऊनच चर्चा व व्याख्याने ठेवावी लागत.

प्रश्नावली भरताना नेमकी माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारावे लागत. निरक्षर स्त्रियांची प्रश्नावली प्रत्यक्ष जावूनच भरून घ्यावी लागली. व्याख्याने, गटचर्चा यांची सवय नसल्याने लक्ष देण्याची प्रवृत्ती कमी होती. त्यासाठी प्रेरणा निर्माण करावी लागे. हळुहळू त्यात बदल झाला. गटचर्चेला स्त्रिया स्वत: सहभागी होऊन इतरांना जमविण्याचे काम करू लागल्या. चित्रफिती, प्रदर्शने यांचे महत्त्व अनेकींच्या प्रतिक्रियेतून व्यक्त होत असे. व्ही. सी. आर. वर चित्रफित दाखवितांना तंत्रज्ञाची गरज लागे. अशा अडचणींतून मार्ग काढत कार्यक्रमांची कार्यवाही केली व हा कार्यक्रम एक वर्षभर १ मार्च १९९८ पासून मार्च १९९९ पर्यंत राबविला.

तिसरा टप्पा - कार्यक्रमोत्तर बदल पाहण्यासाठी कायक्रमपूर्व तयार केलेल्या तिन्ही क्षेत्रातील प्रश्नावल्या पुन्हा नमुना गटातील स्त्रियांना दिल्या व प्रतिसाद पाहिला.

माहितीचे संकलन - लोकसंख्येतून निवडलेल्या नमुन्यातून पूर्वनियोजित संशोधन साधनांचा प्रत्यक्ष उपयोग करून माहितीचे संकलन केले.

संशोधिकेने प्रयोगपूर्व व प्रयोगोत्तर प्रश्नावली भरून घेतली व मिळालेल्या माहितीचे उद्दिष्टानुसार वर्गीकरण केले व माहितीचे कोष्टकात रूपांतर केले. प्रश्नावली प्रत्यक्ष निरीक्षण या साधनाव्दारे माहिती घेतली.

उपलब्ध माहितीचे संघटन, पृथःकरण, विशदीकरण व निष्कर्षाचे सूत्रीकरण संशोधन समस्येच्या संदर्भात पूर्वनियोजित साधनांचा उपयोग करून मिळालेल्या संघटन पृथःकरण व विशदीकरण करून निष्कर्षांचे सूत्रीकरण करावे लागते त्याव्दारे एक अर्थपूर्ण चित्र संशोधन अहवालाव्दारे वाचकाऱ्समोर उभे रहाते.

**१. संघटन -**

गोळा केलेल्या माहितीचे संपादन वर्गीकरण व कोष्टके तयार करणे म्हणजे संघटन. संशोधिकेने मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करून कोष्टकात रूपांतर केले.

**२. माहितीचे पृथःकरण -**

''कोष्टकात लिहिलेल्या माहितीचा अभ्यास करून मूळची वस्तुस्थिती किंवा गर्भितार्थ वाचकारा समजावून देण्याचा संशोधक ज्या पध्दतीने प्रयत्न करतो त्या प्रक्रियेस पृथःकरण संबोधिले जाते''. [५]

संशोधिकेने वरील बाबी लक्षात घेऊन माहितीचे सुलभरित्या स्पष्टीकरण केले व कोष्टकबध्द माहितीचा शेकडेवारी व आलेख यांच्या सहाय्याने मांडणी करून त्यात स्पष्ट रूप दिले.

**३. विशदीकरण -**

''पृथःकरण केलेल्या माहितीचे टीका व कुलशतेने गुणावगुण विवेचन करणारी प्रक्रिया म्हणजे विशदीकरण होय.'' [१]

संशोधिकेने कोष्टकबध्द, आलेखबध्द माहितीचा अर्थ व महत्त्व विशद केले.

**४. निष्कर्षाचे सूत्रीकरण -**

वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे निर्णायक निष्कर्ष काढले. निष्कर्षाची विधाने साध्या व सोप्या भाषेत मांडली.

**५.अहवाल लेखन -**

संशोधन अहवालाच्या विहीत नमुन्यात अहवालाची हस्तलिखीत प्रत तयार केली. पृथःकरण, विशदीकरण यासंबधी माहिती प्रकरण ४ मध्ये केली आहे. निष्कर्ष व शिफारशी यांची चर्चा प्रकरण ५ मध्ये केली आहे.

**संदर्भ :**


१. भा. गो. बापट, <u>शैक्षणिक संशोधन</u> (पुणे, नूतन प्रकाशन १९७५) पृष्ठ १०२.

२. कित्ता पृ. १०५.

३. शां. शं. शेटे, पु. दि. केसकर, <u>शालेय संशोधन प्रकल्प</u>, (कोल्हापूर, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, महाव्दार १९७२) पृ. २२.

४. रा. शं. मुळे, वि. तु. उमाठे, <u>शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे</u>, (नागपूर, साहित्य प्रसार केंद्र, सीतावार्डी, १९७७) पृ. २०२.

५. शा. शं. शेटे, पु. दि. केसकर उपरोक्त पृ. ४०.

६. कित्ता पृ. ४०.